# जपानी पुष्परचना - भाग २१




जपानी पुष्पपात्रा (vase) मधील जपानी मुक्त रचना! पुष्पपात्रावर फिकटसा जांभळा रंग, जांभळे ऑर्किड आणि साधीसुधी नाजूकशी गुलाबी जांभळट छटेतील हसरी सदाफुली!! सदाफुलीच्या फुलामागे सुंदरसे पानांचे हिरवे कोंदण आणि ऑर्किडला हिरव्या नेचाच्या पानाचे कोंदण!! थोडेसे डोकावणारे पांढऱ्या चांदणीसारखे दिसणारे जिप्सो! वा.... रचना करून झाल्यावर समाधान वाटले एकदम! कधी कधी रचनेतील मांडणी छान मनासारखी पटकन जुळून येते.

साधी कुठेही उगवणारी सामान्य सदाफुली आणि श्रीमंत ऑर्किड ... पण त्यांच्या दोघांतील मैत्रीचा भाव मात्र सहज, साधा, निरागस, सुखावणारा वाटतोय. हिरवी पाने हा मैत्रीचा सुगंध पसरवायचे संकेत देत आहेत. लांब जाणारी सदाफुलीची फांदी तुम्हालाही मैत्रीची हाक देत आहे.

आजची रचना मैत्रीला समर्पित!! असाच मैत्रीभाव जगात कायम निर्माण होवो...वाढत राहो....टिकून राहो!!

**- सौ. अरुंधती देशपांडे**

M.Sc. M.Phil. (Chemistry)

प्रोफेसर, इकेनोबो इकेबाना

व्हाईस प्रेसिडेंट, पुणे शाखा

ई-मेल asdssd@gmail.com